**ठळक बातम्या**

- परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर तीन देशांच्या दौऱ्यावर रवाना सौदी अरेबियात रियाध इथं जीसीसीच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार.

- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर.
- जम्मू काश्मीरमधे विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराला वेग

- मुंबईत केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधीक्षकासह तीन जणांना लाचखोरी प्रकरणी अटक

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेचा आज समारोप / पदकतालिकेत भारत १६व्या स्थानावर

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज तीन देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात ते आज दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या भेटीसाठी रियाधला इथं पोहोचले. या भेटीत ते रियाध इथं होत असलेल्या पहिल्या भारत- आखात सहकार्य संघटनेच्या - जीसीसीच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. पश्चिम आशियातले ६ देश या संघटनेचे सदस्य आहेत या शिवाय या दोन दिवसांच्या भेटीत ते जीसीसीच्या सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांसमवेत द्विपक्षीय बैठका घेण्याचीही शक्यता आहे.

आखाती देशांमध्ये जवळपास ८९ लाख एवढ्या मोठ्या संख्येनं भारतीय समुदाय स्थलांतरित झाला असल्यानं जीसीसी हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार आहे. त्यामुळं भारत आणि आखाती देश यांच्यात विविध क्षेत्रांमध्ये असलेल्या सहकार्याचा आढावा घेण्यासाठी आणि ते अधिक बळकट करण्यासाठी जीसीसीची परिषद ही चांगली संधी असल्याचं पराराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

येत्या मंगळवारी ते आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात दोन दिवसांच्या जर्मनी भेटीसाठी रवाना होतील. जर्मनीचा दौरा आटोपून १२ सप्टेंबरला ते स्वित्झर्लंड भेटीसाठी रवाना होतील. स्वित्झर्लंडमध्ये ते जीनिव्हा इथं स्वित्झर्लंडचे परराष्ट्र मंत्री तसंच, भारताचा सक्रीय सहभाग असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख आणि प्रतिनिधींची भेट घेणार आहेत.

<><><><><>

संयुक्त अरब अमिरातीचे युवराज शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान आजपासून भारताच्या अधिकृत दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या या दौऱ्यात ते नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. संयुक्त अरब अमिरातीचे भारताशी असलेले घनिष्ठ संबंध आणखी बळकट करणं हा त्यांच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. युएईचे मंत्री, वरिष्ठ अधिकारी, उद्योजक तसंच आर्थिक भागीदारांचं उच्चस्तरीय शिष्टमंडळही या दौऱ्यात शेख खालेद यांच्या समवेत असणार आहे. या दौऱ्यात भारतातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियोजित भेटीगाठींमध्ये ते महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रात सहकार्य बळकट करण्यावर चर्चा करणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. आज संध्याकाळी साडेपाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय

विमानतळावर त्यांचं आगमन होईल. त्यानंतर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई समाचारच्या द्विशताब्दी निमित्त तयार केलेल्या लघुपटाचं ते अनावरण करतील. १८२२ मधे मुंबईत सुरु झालेलं हे गुजराती वर्तमानपत्र आशियातल्या सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे.

गृहमंत्री शाह उद्या दिवसभर मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी तसंच त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन ते गणपती दर्शन घेतील. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आणि त्यानंतर वांद्रे पश्चिमेतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला शाह भेट देणार आहेत.

**<><><><><>**

गणेशोत्सवाचा आज दुसरा दिवस असून दीड दिवसाच्या गणपतींच विसर्जन आज होणार आहे. ठिकठिकाणी गणेशविर्सजनासाठी महानगरपालिका आणि इतर स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. मुंबई महानगरपालिकेनं केलेल्या नियोजनाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारी मागं घेण्याची मुदत संपली असून आता प्रचाराला वेग येत आहे. भारतीय जनता पार्टीनं प्रचाराला जोमदार सुरुवात केली आहे. पक्षाचे स्टार प्रचारक संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज रामबन आणि बनिहालमधे प्रचारसभा घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल जम्मूच्या पालोरा भागात सभा घेतली. काँग्रेस नेता राहुल गांधी यांनीही जम्मू काश्मीरला भेट दिली. या आठवड्यात प्रधआनमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी, पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या प्रचारसभा होणार असल्याचं आकाशवाणी वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच केंद्र सरकार जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा पुन्हा मिळू शकेल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.  जम्मूमध्ये काल भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. विधानसभा निवडणुका झाल्यानंतर योग्यवेळी जम्मू-काश्मीला राज्याचा दर्जा बहाल केला जाईल असं आपण स्वतः संसदेत ऑगस्ट २०१९ मध्ये आश्वासन दिलं होतं, असंही ते म्हणाले. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये प्रथमच विधानसभेची निवडणूक होत असल्यानं ती ऐतिहासिक असल्याचंही अमित शाह म्हणाले.

<><><><>

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं मुंबईतल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधीक्षक आणि त्याच्या साथीदारांसह तीन जणांना २० लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडलं. मुंबईतल्या सांताक्रूझ इथल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कर कार्यालयातले अधिकारी आणि अन्य ८ जणांनी अटक

टाळण्यासाठी ६० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार सीबीआयला प्राप्त झाली होती. त्यानंतर सीबीआयनं सापळा रचून कारवाई केली.

मागणी केलेल्या लाचेपैकी ३० लाख रुपये हवाल्यानं स्वीकारले असल्याची माहितीही सीबीआयनं दिली आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केल्यावर, न्यायालयानं वस्तू आणि सेवाकर अधिक्षक आणि सनदी लेखापाल असलेल्या आरोपींना १० सप्टेंबर पर्यंत सीबीआय कोठडी, तर त्यांच्या साथीदाराला न्यायालयीन कोठडी दिली आहे.

आरोपींनी तक्रारदाराला बेकादेशीरपणे ताब्यात घेऊन, अटक करण्याची धमकी दिल्याचं तक्रारदारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन आहे. व्यक्ती, समुदाय तसंच समाजाच्या दृष्टीनं साक्षरतेच्या महत्त्वाचं स्मरण करून देण्यासाठी दरवर्षी ८ सप्टेंबरला हा दिवस साजरा केला जातो. “बहुभाषिक शिक्षणाला प्रोत्साहन आणि परस्पर सामंजस्य तसंच शांततेसाठी साक्षरता” ही यंदाच्या साक्षरता दिनाची संकल्पना आहे.

यानिमित्तानं केंद्रीय शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या वतीनं काल स्पेक्ट्रम ऑफ लिटरसी ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजन केली गेली होती. समकालीन जगातील साक्षरतेशी संबंधित विविध पैलूंवरच्या संशोधनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणं तसंच यानिमीत्तानं होणाऱ्या चर्चांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना सहभागी करून घेणं हा या परिषदेचा उद्देश होता.

**<><><><><>**

बांगलादेशाचं 'आमार शोनार बांग्ला' हे राष्ट्रगीत बदलण्यात येणार नाही, असं बांगलादेशाच्या हंगामी सरकारनं स्पष्ट केलं आहे. मागच्या काही दिवसांपासून राष्ट्रगीत बदलण्याची मागणी देशातल्या कट्टरतावादी संघटनांकडून केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रगीत बदलणार नसल्याचं स्पष्ट करत सरकारनं सुरू झालेल्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. बांगलादेश जमात ए इस्लामीचे माजी अमीर गुलाम आजम यांचे पुत्र अब्दुल्लाहिल अमान आजमी यांनी राष्ट्रगीत बदलण्याची मागणी केली होती. या राष्ट्रगीतात बंगालच्या पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही भागांना एकत्र करण्याबद्दल विचार आहेत. त्यामुळे स्वतंत्र बांगलादेशासाठी हे राष्ट्रगीत योग्य नाही, असा आक्षेप त्यांनी घेतला आहे.

दरम्यान, मोहम्मद युनुस यांच्या नेतृत्वाखालचं हंगामी सरकार सर्वांच्या सहकार्यानं बांगलादेशाचं निर्माण करू इच्छितं असल्याचं सरकारच्या धार्मिक बाबींविषयीचे सल्लागार अबुल फैज मुहम्मद खालिद यांनी सांगितलं आहे. देशात अल्पसंख्यकांवर हल्ले करणाऱ्यांना शिक्षा केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत एकूण २९ पदकांची कमाई करुन भारतानं पदकतालिकेत सोळावं स्थान पटकावलं आहे. भारतीय खेळाडूंनी सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि १३ कांस्य पदकं मिळवून स्पर्धेच्या इतिहासात भारताच्या सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत नवदीप सिंगनं काल सुवर्णपदक मिळवलं. इराणच्या खेळाडूनं प्रथम क्रमांक पटकावला होता, मात्र अयोग्य वर्तनासाठी त्याला अपात्र ठरवण्यात आल्यानं नवदीपला सुवर्णपदकाचा मान मिळाला. धावपटू सिमरन शर्मानं महिलांच्या २०० मीटर ट्रॅक स्पर्धेत

कास्यपदक जिंकलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदक विजेत्या खेळाडूचं अभिनंदन केलं आहे. मोदी यांनी काल प्रवीण कुमार आणि होकातो होतोझे सेमा या पदक विजेत्या खेळाडूशी दूरध्वनीवरून संवाद साधून त्यांची प्रशंसा केली. वयाच्या ४०व्या वर्षी आपल्या पहिल्याच पॅरालिम्पिक स्पर्धेत पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात कास्य पदक पटकावणाऱ्या होकातो होतोझे सेमा याचं त्यांनी अभिनंदन केलं. दरम्यान, पॅरिसहून परतलेल्या पॅरालिम्पिक खेळाडूंचा नवी दिल्लीत केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते काल सत्कार करण्यात आला. यामध्ये अवनी लेखरा, मनीष नरवाल, प्रणव सूरमा, मोना अग्रवाल, रुबिना फ्रान्सिस आणि राकेश कुमार यांचा समावेश होता.

**<><><><><>**

झिम्बाब्वे, झांबिया आणि मलावी या आफ्रिकेतल्या दुष्काळग्रस्त देशांना भारतानं अन्नधान्य पाठवलं आहे.

**//<><><><><>//**